मा० न्यायालया करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** जळगांव शहर  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0233  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 27/07/2022 18:15 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 27/07/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/07/2022

**Time From (वेळेपासून):** 14:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/07/2022  **Time (वेळ):** 17:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 027  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/07/2022 17:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रेल्वे स्टेशन जवळील,संजय गांधी निराधार योजना , कार्यलिय जळगांव,जळगाव , 425001

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हसिना रहीम तडवी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राचुंचाळे तालुका यावल,हमु जोशी कलणी,राज किराणा जवळ जळगांव ,जळगांव शहर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राचुंचाळे तालुका यावल,हमु जोशी कलणी,राज किराणा जवळ जळगांव ,जळगांव शहर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मगन गोमा भोई | | | 1. गट नं 165 प्लट क्रं 03,,जिजाऊ नगर,वाघ नगर जवळ जळगांव,महसुल विभाग वर्ग 04,जळगाव,जळगांव शहर, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लागलीच दाखल

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/ रु. त्यात 500 रुपये दराच्या 04 चलणी नोटा अ.पा लावलेल्या | 2,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 2,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

1.पोलीस स्टेशन गुरनं. व कलम जळगांव शहर पो.स्टे. गुरनं 233/2022 ला.लु.प्रती अधिनीयम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे2.मुळ तक्रारदार व फिर्यादी--हसिना रहीम तडवी , वय-35 वर्ष, व्यवसाय- खाजगी नोकरी ह.मु. जोशी कलणी राज किराणा जवळ जळगांव मुळ रा-चुंचाळे तालुका यावल3. आरोपीचे नाव व पत्ता -मगन गोमा भोई वय-52 वर्ष व्यवसाय-नोकरी शिपाई तहसिल कार्यालय जळगांव रा-गट नं 165 प्लट क्रं 03,जिजाऊ नगर,वाघ नगर जवळ जळगांव(महसुल विभाग वर्ग 04)4.गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण--दि.27/07/2022 रोजी 14.17 वा. जळगांव शहरात जळगांव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय जळगांव येथील 5. गुन्हा दाखल ता. वेळ दि.27/07/2022 रोजी 6.आरोपी अटक व ता. वेळ दि.27/07/20227.लाचेची मागणी व रक्कमतडजोडीअंती 2000 /- रु.8. स्विकारली रक्कम --2000/- रु. त्यात 500 रुपये दराच्या 04 चलणी नोटा अ.पा लावलेल्या 9.सापळा व तपास अधिकारी--पो.उप अधिक्षक श्री.एस.एस पाटील न्टी करप्शन ब्युरो, जळगांव.थोडक्यात हकीकत- यातील फिर्यादी यांनी त्याचे स्वताचे व त्याचे आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अर्थ सहाय्य अनुदान मंजुर होण्यासाठी तहसिल कार्यालय जळगाव अंतर्गत संजय गांधी निराधार योजना कार्यालय जळगाव यांच्याकडे दि.06/10/2021 रोजी अर्ज सादर केले होते परतुं सदर अर्जावर 05 महिन्याचा कालावधी होवुन देखिल काही कार्यवाही झाली नाही म्हणुन फिर्यादी यांनी सुमारे 7-8 दिवसा पुर्वी सदर कार्यालयात जावुन आलोसे यांची भेट घेवुन प्रकरणाबाबत विचारपुस केली असता आलोसे यांनी फिर्यादीस तुमचे व तुमच्या आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत मिळणा-या अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्यासाठी आईच्या कामाचे 3000/- रुपये व तुमच्या कामाचे 2000/-असे एकुण 5000/- रुपये लाच मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि.27/07/2022 रोजी ला.प्र.वि.जळगांव कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दि. 27/07/2022 रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकाने पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी फिर्यादी यांच्या आईच संजय गांधी निराधार योजना अंतर्गत अर्थसहाय्य अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचेकडेस पंचासमक्ष तडजोडीअंती 2000/- रु लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली त्यानंतर आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडुन 2000/- रुपये वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा.सोबत- संगणीकृत केलेली फिर्यादीची प्रत सोबत जोडली आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or** (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SANGITA Maruthiroa KHANDARE
**Rank** (पद): Asst. SI (Assistant Sub-Inspector)
**No.**(क्र.): PCMH89294 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

H B Yadav

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Vijaykumar narsingrao thakur
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pi

फिर्याद

जळगाव शहर पोलीस स्टेशन
दिनांक २७.०७.२०२२

**मी हसीना रहीम तडवी, वय ३५ वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी ह.मु.जोशी कॉलनी, राज किराणा जळगांव ता.जि.जळगांव मुळ रा.चुंचाळे ता.यावल जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देते की, मी वरील ठिकाणी माझी विधवा आई मदीना रहीम तडवी व माझी मुलगी कु.आलीया तडवी यांचेसह राहत असुन मी जैन व्हॅली, जळगांव येथे रोजंदारीने काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करते.

दि.२७.०७.२०२२ रोजी सकाळी मी अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालय जळगांव येथे समक्ष जावुन पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेकडेस तहसिल कार्यालय जळगाव अंतर्गत जळगाव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय जळगाव येथील कर्मचारी भोई यांचे विरूध्द लाचे सबंधी तक्रार केली होती. तेव्हा पाटील साहेब यांनी दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले होते. त्यानंतर पाटील साहेब यांनी दोन्ही शासकिय पंचाची, कार्यालयात उपस्थित असलेले सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली होती. त्यानंतर प्रथम मी माझी तक्रार पाटील साहेब यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वतःचे हस्ताक्षरात को–या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

माझे वडील रहीम तडवी हे सन २०१७ मध्ये मयत झाले आहेत. सन २०१७ मध्ये माझे पती पासुन माझा घटस्फोट झालेला आहे. त्यामुळे माझे आईची व माझे मुलीची जबाबदारी माझेवर आहे. माझी आई व मी स्वतः निराधार असल्याने महाराष्ट्र शासनाचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अर्थसहाय्य मिळणेसाठी मी तहसिल कार्यालय, जळगांव अंतर्गत असलेल्या जळगांव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे जावुन माझा स्वतःचा अर्ज व माझे आईचा अर्ज असे दोन प्रकरणे दि.०६.१०.२०२१ रोजी सादर केले होते. त्यावेळी सदर प्रकरणांची पोच पावती मिळाली होती.

माझे स्वतःचे व माझे आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अनुदान मंजुरीचे प्रकरणांवर ०५ महिन्यांचा कालावधी होवुन देखील काहीही कारवाई झाली नाही म्हणुन मी सुमारे ०७/०८ दिवसांपुर्वी सदर कार्यालयात जावुन संबंधीत कर्मचारी भोई यांची भेट घेतली व माझे तसेच माझे आईचे अनुदान मंजुरीचे प्रकरणांबाबत विचारपुस केली असता कर्मचारी भोई यांनी मला सांगितले की, तुमचे व तुमच्या आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत मिळणा–या अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्यासाठी तुम्ही आईच्या अनुदानाच्या कामाचे ३०००/–रु. व तुमच्या अनुदानाच्या कामाचे २०००/–रु. असे एकुण ५०००/–रु. आणुन द्या. तुम्ही जर मला ५०००/–रु. आणुन दिले तर मी लागलीच तुमच्या दोन्ही अनुदानाचे प्रकरणे मंजुरीचे काम करुन आणुन देतो असे सांगितले.

त्यावेळी कर्मचारी भोई हे माझे व आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात ५०००/–रु. लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, तुम्ही प्रकरण तयार करुन ठेवा, मी तुम्हाला नंतर येवुन भेटते, असे सांगितले तेव्हा कर्मचारी भोई यांनी मला याच कार्यालयात येवुन भेटा, असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून निघुन आले आहे.

माझे व आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत मिळणा–या अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात कर्मचारी भोई यांना ५०००/–रु. लाचेची रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर कर्मचारी भोई यांना ५०००/–रु. लाचेची रक्कम दिली नाही तर ते माझे व माझे आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत मिळणा–या अर्थसहाय्य अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देणार नाहीत. अथवा सदर प्रकरणांमध्ये विनाकारण त्रुटया काढून विलंब करतील म्हणुन मी नाईलाजास्तव कर्मचारी भोई यांना ५०००/–रु. लाचेची रक्कम देण्यास तयार झाली आहे. मी कर्मचारी भोई यांची भेट घेण्यास जळगांव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे आज रोजी जाणार आहे बाबत तक्रार दिली होती.

त्यानंतर पाटील साहेब यांनी पुढील सापळा कारवाई जळगाव शहरातील सागर पार्क मैदान येथे जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पाटील साहेब, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी व मी असे शासकीय वाहन क्रमांक एम.एच.१९ एम ०७३४ या वाहनाने अॅन्टी करप्शन कार्यालय जळगाव येथुन निघुन जळगाव शहरातील सागर पार्क मैदान येथे पोहोचलो.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले. पाटील साहेब यांच्या सुचनेनुसार पोकॉ नासीर देशमुख यांनी सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकले त्यानंतर पोकॉ नासीर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ नासीर देशमुख यांनी सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे जवळील पर्स मधील पहिल्या कप्प्यात ठेवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह कर्मचारी भोई यांची भेट घेण्यासाठी जळगाव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे प्रवासी अॅटो रिक्षा वाहनाने पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह जळगाव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे गेली. सदर कार्यालयात कर्मचारी भोई हे एका टेबल समोरील खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा मी पंच क्र.१ यांचे सह कर्मचारी भोई यांचे जवळ गेली व त्यांची भेट घेतली. तेव्हा मी कर्मचारी भोई यांना नमस्ते करून माझे काम कधी होईल, माझे आईचे व माझे काम आहे, या महिन्यात येणार होते ना नाव? असे विचारले असता कर्मचारी भोई यांनी बाहेर यादी लावली आहे, चेक करून घ्या, असे सांगीतले त्यांनंतर मी पंच क्र ०१ यांचेसोबत जावुन सदर कार्यालयाच्या बाहेरील भिंतीवर लावलेल्या यादीत माझे व आई चे नाव पाहिले असता आमची नावे दिसुन आले नाही, त्यामुळे मी व पंच क्र ०१ असे पुन्हा कर्मचारी भोई यांचे जवळ गेलो. तेव्हा मी कर्मचारी भोई यांना सर, नाव नाही आहे, तुम्ही सांगुन दया, केव्हा होईल, काय होईल, असे विचारले असता कर्मचारी भोई यांनी मी त्यादिवशीच सांगीतले होतं, तुझे आईचे करून देतो, तु निघुन गेली तेव्हा, बाबत व कामासंदर्भात इतर चर्चा झाली. तेव्हा कर्मचारी भोई यांनी मला त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैशांचा इशारा केला. तेव्हा मी त्यांना तुम्ही तीन हजार रूपये आईचे व माझे दोन हजार रूपये असे पाच बोलले होते, परंतु सध्या माझेजवळ पैसे नाही, मी आईचे दोन हजार रूपये व माझे दोन हजार रूपये असे चार हजार रूपये आणुन देते, असे सांगीतले असता कर्मचारी भोई यांनी तुझे आईचे घेवुन ये अगोदर, असे सांगुन त्यांच्या उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन तसेच उजव्या हाताच्या अंगठयाने व पहिल्या बोटाने पैशांचा इशारा करून दोन हजार रूपये लाच मागणी केली. तेव्हा मी कर्मचारी भोई यांना आईचे दोन हजार रूपये घेवुन येते, चार वाजेपर्यंत येते असे सांगीतले असता कर्मचारी भोई यांनी मानेने होकार दर्शवुन संमती दिली. त्यानंतर मी पंच क्र ०१ यांचे सह सदर ठिकाणाहुन निघुन प्रवासी अॅटो रिक्षाने सागर पार्क मैदानाजवळ येवुन सापळा पथका जवळ परत आली होती.

त्यानंतर माझे व कर्मचारी भोई यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी, सापळा पथकाने व पाटील साहेब यांनी ऐकले. तेव्हा दोन्ही पंच व पाटील साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने पाटील साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरीत्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर कर्मचारी भोई यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली २०००/—रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या ०४ चलनी नोटा) पाटील साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावली. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ ईश्वर धनगर यांनी २०००/—रु. (त्यात ५००/—रू.दराच्या ०४ चलनी नोटा) लाच रक्कम माझे जवळील पर्समधील मधल्या कप्प्यात अलगद ठेवुन दिली होती.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे जवळील पर्स मधील पहिल्या कप्प्यात ठेवुन दिले होते. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह कर्मचारी भोई यांची भेट घेवुन त्यांना २०००/— रु. लाच रक्कम देण्यासाठी जळगाव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह सागर पार्क मैदान येथुन निघुन रस्त्यावर येवुन प्रवासी अॅटो रिक्षा वाहनात बसुन रेल्वे स्टेशन स्टॉप जवळ उतरले त्यानंतर जवळच असलेल्या संजय गांधी निराधार योजना कार्यालय येथे गेली. तेव्हा पाटील साहेब यांनी आमचे मागोमाग येवुन रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या परिसरात सापळा लावला होता.

त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या आत गेलो. सदर कार्यालयात एका टेबल समोरील खुर्चीवर कर्मचारी भोई हे बसलेले होते. तेव्हा मी व पंच क्रं.१ असे कर्मचारी भोई यांचे जवळ गेलो. तेव्हा कर्मचारी भोई मला त्यांच्या उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन तसेच उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैशांचा इशारा करून पैसे आणले आहेत का? असे इशा—याने विचारले तेव्हा मी माझे जवळील पर्स मधील मधल्या कप्प्यात ठेवलेली लाचेची रक्कम २०००/—रु.त्यात ५००/—रु.दराच्या ०४ चलनी नोटा बाहेर काढुन कर्मचारी भोई यांचे समोर धरले व हे आईचे आणुन दिले मी, तीने एटीएम मध्ये टाकले, गोलाणी मार्केटचे एटीएम होते, तिकडुन काढुन आणले मी पटकन हे दोन हजार रूपये, असे सांगितले. तेव्हा कर्मचारी भोई यांनी त्यांच्या समोरील टेबलवर

असलेल्या एका वर्तमान पत्राकडे उजव्या हाताच्या बोटाने इशारा करून सदर लाच रक्कम वर्तमान पत्रामध्ये ठेवण्यास सांगीतली. तेव्हा मी कर्मचारी भोई यांचे समोरील टेबलवर असलेले वर्तमान पत्र उचकवुन त्यामध्ये सदर लाच रक्कम ठेवली. तेव्हा कर्मचारी भोई यांनी ठिक आहे असे सांगीतले. तेव्हा मी कर्मचारी भोई यांना पेपराच्या खाली ठेवले, असे सांगीतले व माझे काम लवकरात लवकर करण्यास सांगितले. तेव्हा कर्मचारी भोई यांनी तुमचे काम होवुन जाईल, असे सांगीतले. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा पाटील साहेब व सापळा पथक यांनी कर्मचारी भोई यांना रंगेहाथ पकडले. त्यांनतर पाटील साहेब यांचे सुचने नुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी माझे जवळील पर्स मधील पहिल्या कप्प्यात असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पाटील साहेब यांनी कर्मचारी भोई यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पाटील साहेब यांनी कर्मचारी भोई यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मगन गोमा भोई, वय ५२ वर्षे, व्यवसाय नोकरी, शिपाई, तहसील कार्यालय जळगाव रा.गट नं १६५ प्लॉट नं ३ जिजाऊ नगर, वाघ नगर जवळ,जळगांव (खाते महसुल विभाग वर्ग–४) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने मगन गोमा भोई यांना ताब्यात घेतले. तसेच ज्या वर्तमान पत्रामध्ये लाचेची रक्कम ठेवली होती ते वर्तमान पत्र ताब्यात घेतले तसेच मगन भोई यांचे समोरील टेबलवर असलेले संजय गांधी योजनेचे एक रजिष्टर पुढील तपास कामी ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालय येथे करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये माझे, आलोसे मगन गोमा भोई व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. तसेच आलोसे मगन भोई यांनी ज्या वर्तमान पत्रामध्ये लाचेची रक्कम ठेवण्यास सांगीतली होती त्या वर्तमान पत्राची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आलोसे मगन गोमा भोई, शिपाई, तहसील कार्यालय जळगाव जि.जळगांव यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी दि.२७. ०७.२०२२ रोजी प्रथम माझे आईचे संजय गांधी निराधार योजना अंतर्गत अर्थसहाय्य अनुदान मंजुरीचे काम करून आणुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस पंचासमक्ष तडजोडीअंती २०००/–रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यानंतर दि.२७.०७.२०२२ रोजी १४.१७ वा. जळगाव रेल्वे स्टेशन जवळील संजय गांधी निराधार योजना कार्यालयात आलोसे मगन भोई यांनी माझेकडुन २०००/– रू.लाचेची रक्कम (त्यात ५००/–रू. दराच्या ०४ चलनी नोटा) स्वतःस्विकारली आहे. म्हणुन माझी आलोसे मगन गोमा भोई, शिपाई, तहसील कार्यालय जळगाव जि.जळगांव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष
27.7.2022
शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही
दि.२७.०७.२०२२